बिना सहकार नहीं उध्दार !

# अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

३९/२/२, एरंडवणा, पुणे-४११०३८.
नोंदणी क्र.: पी.एन.ए./एच.एस.जी./(टी.सी.)/१७०७/१९८९-९० दि. २७/१०/१९८९
Email : archananagar.chs @gmail.com

जा. क्र. 2024-25/28

दि. 4.2.2025

## संस्थेच्या पुनर्विकास कामाबाबत विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

अर्चना नगर सहकारी गृहचना संस्थेच्या पुनर्विकासाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. याबाबत संस्थेने यापूर्वी केलेली कार्यवाही, घेतलेले निर्णय व प्रक्रिया आपणास यापूर्वीचा इतिवृत्त मधून अवगत केलेली आहे.

संस्थेची कार्यकारी समिती व पुनर्विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने प्राप्त निविदांपैकी यापूर्वी शॉर्टलिस्ट केलेल्या ५ विकासकांबाबत व पुढील कार्यपद्धतीबाबत आपणास दिनांक ३ जानेवारी २०२५ च्या संयुक्त समितीच्या इतिवृत्तांताद्वारे कळविण्यात आले आहे.

तदनंतर त्यापैकी तीन विकासकांची नावे शॉर्टलिस्ट करण्याची कार्यवाही संयुक्त समिती व पीएमसी द्वारे करण्यात आली आहे. या सर्व प्रक्रियाबाबत व पुढील नियोजित कार्यपद्धतीबाबत संस्थेतील सर्व सदस्यांना अवगत करण्याच्या दृष्टीने रविवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळात संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा, स्व. मुकुंदराव पणशीकर कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र, सेवा भवन, तळमजला, सर्वे नंबर १३६, प्लॉट नंबर ३४, पुणे ४११००४ येथे, आयोजित करण्यात येत आहे.

संस्थेच्या पुनर्विकास कार्याची पुढील दिशा ठरवण्याच्या दृष्टीने या सभेत धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असल्याने सर्व सदस्यांना विनंती आहे की त्यांनी शक्यतो व्यक्तिशः सभेस उपस्थित राहावे.

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित

सचिव